राज्यातील जिल्हाधिकारी व अपर जिल्हाधिकारी यांच्यातील तसेच निवासी उपजिल्हाधिकारी व उपजिल्हाधिकारी (महसूल) यांचे मधील कामाचे फेरवाटप करणेबाबत... शुध्दीपत्रक

महाराष्ट्र शासन

महसूल विभाग

शासन शुध्दीपत्रक क्रमांक : संकिर्ण-२०२५/प्र.क्र.२७१/आस्था-०१ (ई-१४९४८३७)

मंत्रालय मुख्य इमारत, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२
दिनांक- २० नोव्हेंबर, २०२६

वाचा: -

१. शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग क्र. संकीर्ण ०२/२०११/प्र.क्र.१३/ई-१, दि.२९.०३.२०१२
२. शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग क्र. संकीर्ण ०२/२०१२/प्र.क्र.४३/ई-१, दि.२८.१२.२०१२
३. शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग क्र.संकीर्ण-०२/२०१२/प्र.क्र.४३/ई-१, दि.०४/१०/२०१३.
४. शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग क्र.संकीर्ण २०१४/०५/प्र.क्र.६९/ई-१, दि.०२.०६.२०१४.
५. शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.२८/ई-१अ, दि.२४/०४/२०१७.
६. शासन निर्णय महसूल व वन विभाग क्र.कार्यशा-२०२५/प्र.क्र.०६/म-८ दि.०९/०४/२०२५.
७. शासन निर्णय महसूल व वन विभाग क्र.संकिर्ण-२०२५.क्र.प्र/२७१/आस्था-०१ दि.०३.०७.२०२६.
८. शासन निर्णय महसूल व वन विभाग क्र.संकिर्ण-२०२५.क्र.प्र/२७१/आस्था-०१ दि.३१.०७.२०२६.

शासन शुध्दीपत्रक :-

महसूल विभागाच्या संदर्भाधीन क्र. ८ येथील शासन निर्णयान्वये राज्यातील जिल्हाधिकारी व अपर जिल्हाधिकारी तसेच निवासी उपजिल्हाधिकारी व उपजिल्हाधिकारी (महसूल) यांच्यामधील कामकाजाचे सुधारित वाटप निश्चित करण्यात आले आहे.

०२. सदर शासन निर्णयाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने विविध जिल्हाधिकारी कार्यालये तसेच विभागीय आयुक्त कार्यालयांकडून कामकाजाच्या वाटपामध्ये बदल करण्याबाबत प्रस्ताव प्राप्त झाले आहेत.

०३. प्राप्त प्रस्तावांचा प्रशासकीय आवश्यकता, कामकाजाचे स्वरूप, जबाबदारीची निश्चिती, प्रशासकीय सुसूत्रता व राज्यभर एकसमान कार्यपद्धती राखण्याची आवश्यकता या अनुषंगाने विचार

करून महसूल विभागाच्या दिनांक ३१.०७.२०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आलेल्या कामकाज वाटपामध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदर शासन निर्णयातील परिच्छेद क्र.३ अन्वये निवासी उपजिल्हाधिकारी व उपजिल्हाधिकारी (महसूल) यांच्यामध्ये निश्चित करण्यात आलेल्या कामकाज वाटपामध्ये निवासी उपजिल्हाधिकारी यांच्याकडील विषयांच्या यादीमध्ये पुढील अतिरिक्त विषयाचा समावेश करण्यात येत आहे :

"गौणखनिज विषयक कामकाज (प्रस्ताव जिल्हा खनिकर्म अधिकारी यांनी निवासी उपजिल्हाधिकारी यांना सादर करावेत व निवासी उपजिल्हाधिकारी यांनी जिल्हाधिकारी यांच्या मान्यतेने अंतिम करावेत.) ."

०४. जिल्हाधिकारी व अपर जिल्हाधिकारी तसेच निवासी उपजिल्हाधिकारी व उपजिल्हाधिकारी (महसूल) यांच्यामधील कामकाजाच्या वाटपामध्ये वरील परिच्छेद क्र.३ मध्ये नमूद केलेल्या सुधारणेव्यतिरिक्त या आदेशान्वये अन्य कोणताही बदल करण्यात येत नाही.

०५. सदर प्रकरणी विभागीय आयुक्त कार्यालये व जिल्हाधिकारी कार्यालयांकडून प्राप्त झालेल्या कामकाज फेरवाटपाच्या प्रस्तावांचा विचार करता, राज्यभर कामकाज वाटपामध्ये एकरूपता व सुसूत्रता राखण्याच्या दृष्टीने उक्त प्रस्ताव अमान्य करण्यात येत आहेत.

०६. सदर शासन निर्णयातील सुधारणा वगळता महसूल व वन विभागाच्या दिनांक ३१.०७.२०२६ रोजीच्या शासन निर्णयातील इतर सर्व तरतुदी पूर्ववत लागू राहतील.

०७. सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०२६११२०१७४१०१९३४८ असा आहे. हे शुध्दीपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

MAHESH ASHOKRAO VARUDKAR

Digitally signed by MAHESH ASHOKRAO VARUDKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FORESTS DEPARTMENT, 2.5.4.20=D93C4961D98086877A4048296211D7AF97ECFD40D7967C43D20B360D83CE0FA6, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=7EBBBC3712E8D459EF90BF7AAE4EA46E9CAEBDD50CFECDE2EE7CE0454FA0416A, cn=MAHESH ASHOKRAO VARUDKAR
Date: 2026.11.20 17:41:59 +05'30'

(महेश वरुडकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मा.उप मुख्यमंत्री (नगरविकास/गृहनिर्माण) महोदयांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.उप मुख्यमंत्री (रा.उ.शु., क्रीडा व अल्पसंख्यांक विकास) महोदयांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचे उप सचिव, मंत्रालय, मुंबई
७. सर्व विभागीय आयुक्त.
८. सर्व जिल्हाधिकारी.
९. अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे विशेष कार्य अधिकारी, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. सह सचिव/ उप सचिव (खनिज १/२), महसूल विभाग, मंत्रालय, मुंबई.

११. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२ मुंबई /नागपूर.
१२. अधिदान व लेखा अधिकारी/निवासी लेखा अधिकारी, मुंबई
१३. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१४. संचालक व लेखा कोषागरे, मुंबई.
१५. निवडनस्ती (कार्यासन आस्था-०१), महसूल विभाग, मंत्रालय, मुंबई.

****